# अर्ज निशाणी १३१ खालील आदेश
# (CNR MHSI080002942015)

०१. प्रस्तूत अर्जान्वये वादी यांनी मयत प्रतिवादी क्र.०३ भास्कर जिवबा जाधव व ११ सुरेखा सुर्यकांत फोंडेकर यांचे कायदेशीर वारस मुदतीत रेकॉर्डवर न आणल्याने प्रतिवादी क्र.०३ व ११ विरुध्द झालेला अबेटमेंट आदेश रद्द होऊन मिळणेकरीता विनंती केली आहे. वादी यांचे कथनानुसार, सदर दाव्याचे कामी प्रतिवादी क्र.०३ हे दि.२५/१०/२०२० रोजी व ११ हे दि.१८/११/२०२० रोजी मयत झाले आहेत. प्रतिवादी क्र.०३ व ११ यांचे मुदतीत रेकॉर्डवर आणणे आवश्यक होते. परंतू, वादी यांना कायद्याचे ज्ञान नसल्याने व मयत व्यक्तींचे वारस प्रतिनिधीची नावे व पत्ते वेळी उपलब्ध न झाल्याने वादींना प्रतिवादी क्र.०३ व ११ चा मृत्यूदाखला मिळवून तसेच वारसांची माहिती मिळवून वारस मुदतीत रेकॉर्डवर आणण्यास विलंब झाला आहे. प्रस्तूत प्रतिवादी यांचे वारस रेकॉर्डवर येणे न्यायाच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे. सबब, प्रस्तूत प्रतिवादी क्र.०३ व ११ विरुध्द दावा अबेट झाला आहे. सबब, प्रस्तूत प्रतिवादी क्र.०३ व ११ विरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द करुन मिळणेबाबत वादी यांनी विनंती केली आहे.

०२. प्रतिवादी क्र.४ व ०६ ते १० यांनी सदर अर्जावर आपले म्हणणे दाखल करुन हरकत घेतली आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, अर्ज खोटा व खोडसाळ आहे. प्रतिवादी क्र.३ व ११ हे मयत असल्याबाबत वादींना पुरेपुर माहिती होती. मयतांची माहिती असूनही वादीने प्रतिवादी क्र.३ व ११ चे वारस अभिलेखावर घेणेस प्रचंड विलंब केला आहे. तसेच, विलंबाचे

कारण संयुक्तीक नाही. सबब, वादीचा अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी विनंती केली आहे. न्यायपुर्ततेकरीता अर्ज मंजूर करणेचा झाल्यास प्रतिवादीस खर्चाची रक्कम देववण्यात यावी अशी विनंती केली आहे. तसेच, प्रतिवादी क्र.१२ यांनी नि.क्र.१३७ वर आपले म्हणणे दाखल करुन अर्जास हरकत घेतली आहे. त्यांनी असे कथन केले आहे की, वादीने मयत प्रतिवादींचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी झालेल्या विलंबाबाबत नमुद कारणे खोटी व चुकीची बेकायदेशीर दिलेली आहेत. वारस अभिलेखावर घेण्याकरीता झालेला विलंब हा सुमारे २ वर्षापेक्षा जास्त कालावधीचा आहे. त्यामुळे तो कायद्याने माफ करता येणार नाही. प्रतिवादी मयत असतेवेळीसुध्दा वादींनी दाव्याचे कामकाज जाणीवपूर्वक चालू ठेवून पुरावा दिला. सबब, अर्ज नामंजूर करण्यात यावा. अर्ज मंजूर करणेचा झाल्यास झालेल्या विलंबाबाबत प्रतिवादीला वादीकडून रक्कम रु.५,०००/– ची कॉस्ट मिळावी अशी विनंती केली आहे.

०३. अर्ज व त्यावरील जबाब तसेच, उभय पक्षाच्या विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले असता अर्जात नमुद कारणे ही योग्य असल्याचे दिसून येते. सदर दावा वादीने दावा मिळकतीचे वाटप व पृथ्थक कब्जाकरीता दाखल केला आहे. प्रस्तूत प्रतिवादीचे वारस हे दाव्यास आवश्यक पक्षकार आहेत. परीणामी, दाव्याचे स्वरुप लक्षात घेता, प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे योग्य वाटते. करीता, खालील प्रमाणे आदेश पारित करत आहेः

**– <u>आदेश –</u>**

१. निशाणी क्र.१३१ वरील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्र.०३ व ११ चे वारस मुदतीत अभिलेखावर आणणेस झालेला विलंब वादीने प्रतिवादी क्र.४, ६ ते १० व १२ यांना एकत्रीत रक्कम रु.७००/– खर्च देण्याच्या अटीवर न्यायपुर्ततेकरीता माफ करण्यात येत आहे.

SHUBHAM GOVIND LATURIYA
Digitally signed by SHUBHAM GOVIND LATURIYA
Date: 2025.07.18 17:34:12 +0530

स्थळ : कणकवली (शुभम जी. लटुरिया)

दिनांक : १८/०७/२०२५ दिवाणी न्यायाधीश क.स्तर, कणकवली.